॥ जनसेवा हीच ईश्वरसेवा ॥

स्वामी शामानंद एज्युकेशन सोसायटीचे

# स्वामी शामानंद हायस्कूल

## प्राथमिक विभाग

(मराठी माध्यम)

बृहन्मुंबई महानगरपालिका मान्यताप्राप्त

शासन मान्यताप्राप्त

बर्वेनगर नगर, भटवाडी (पश्चिम), मुंबई-४०० ०८४




# शालेय दैनंदिनी २०२०-२०२१

## ब्रीद वाक्य (Motto)

**प्रज्वलितो ज्ञानमयोदीप:**

**अर्थ – ज्ञानरुपी दिवा अखंड प्रकाशित करणे.**

## आमचे जीवित कार्य -Mission

शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि
राष्ट्रीय स्पंदने विकसित करणे.

## आमची दूरदृष्टी-Vision

ज्ञान-तंत्रज्ञानाच्या आधारे बहुजन व वंचित समाजातील विद्यार्थ्यांना मूल्याधिष्ठीत
शिक्षण देणारी ज्ञानप्रवर्तक संस्था बनणे

## आमची उद्दिष्टे- Goals

1. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी त्यांची वर्तणूक आणि चारित्र्य यांमधून प्रतिबिंबित होईल असे ज्ञान त्यांना देऊन जीवनातील आव्हाने पेलण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण करणे.
2. विद्यार्थ्यांमध्ये भावप्रज्ञा, संघभावना, नेतृत्वगुण, राष्ट्रीय एकात्मता विकसित करून सर्जनशीलता आणि विश्लेषणात्मक कौशल्य यांचे एकत्रीकरण असलेले शैक्षणिक कार्यक्रम देणे.
3. सर्वधर्म सहिष्णुता, सर्व भाषांप्रती सन्मान व पर्यावरणप्रेम इ.विषयांद्वारे आंतरराष्ट्रीय सलोख्याची बीजे तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून सर्वसमावेशक शिक्षणाची गुणवैशिष्टये जोपासणे.
4. जागतिकीकरणाच्या दृष्टीकोनातून मूल्याधिष्ठीत शिक्षणाची जोपासना करणे, दुर्बल घटकांसाठी आर्थिक मदतीचा हात पुढे करून शिक्षण प्रवाह अखंडीत ठेवणे.

# स्वामी शामानंद एज्युकेशन सोसायटीचे

# स्वामी शामानंद हायस्कूल

## दर्जेदार व संस्कारक्षम शिक्षणाची हमी


बर्वेनगर नगर, भटवाडी (पश्चिम), मुंबई-४०० ०८४

ईमेल :swamishamanand.principal@gmail.com दूरध्वनी क्र : २५१५४७५७५


## शाळेविषयी महत्वाचे :



सन १९४८ ते १९४९ मध्ये स्वामी शामानंद महाराज पुण्य अशा गोकर्ण भूमीतून मुंबई मधील घाटकोपर उपनगरातील भटवाडी येथे आले. अध्यात्मातून ज्ञानाचा दीप लोकांमध्ये प्रज्वलित करणे या जाणीवेतून स्वामींनी १९५४ मध्ये माता महाकाली मंदिरात बालवाडी सुरु केली आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या भटवाडी विभागातील मुलांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण झाली. आपल्या परिसरातील मुलांनी ज्ञानाने मोठे व्हावे, समृद्ध व्हावे त्यासाठी शाळा सुरु करावी ही एकच गोष्ट स्वामींच्या मनाला सतावू लागली आणि मग गुरूने आपली मनोकामना निष्ठावंत भक्त स्व.पी.के.शिंदे व श्री. राऊतसरांकडे व्यक्त केली. सरांनी स्वामींच्या इच्छेला स्वीकृती दिली. स्वामींची ही संकल्पना त्यावेळचे आमदार स्व.श्री.दत्ता सामंत, स्व.श्री.शिंदे, श्री. राऊतसर व सॉलीसीटर श्री.शरद चिटणीस यांच्या प्रेरणेतून पूर्णत्वास आली आणि सन १९८७ साली स्वामी शामानंद हायस्कूलची स्थापना झाली. अश्या रीतीने शिशु वर्ग ते बारावी पर्यंतच्या शिक्षणाचे दरवाजे भटवाडी बर्वेनगर परिसरातील शेकडो अल्प उत्पन्न गटातील पालकांसाठी खुले झाले.

संस्थेचे आधारस्तंभ राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मान. राऊतसर व कै. मान.राऊत मॅडम यांच्या नेतृत्वाखाली मागील ३० वर्षे संस्थेचे कार्य अव्याहत सुरु आहे. संपूर्ण शाळा भाड्याच्या खोल्यांमध्ये भरत असतानाही यशाचे किल्ले सर करीत आहे. स्वामींच्या आशीर्वादाचे बळ तर आहेच परंतु परिसरातील सर्व पालक तसेच प्रतिष्ठित व्यक्ती आणि समाजसेवक यांचे सहकार्य यापुढेही सदैव अपेक्षित आहे. ही जबाबदारी उचलण्यासाठी आमचे हात पुढे आहेत, आपले ही हात पुढे होऊ द्यात आणि विद्यादानाचा हा यज्ञ अव्याहतपणे धगधगता राहू द्या.

# विद्या विकास एज्युकेशन सोसायटी
# स्वामी शामानंद एज्युकेशन सोसायटी

## प्रेरणास्थान



आदरणीय **राष्ट्रपती डॉ.शंकर दयाळ शर्मा** यांच्या हस्ते
१९९४ चा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार स्विकारताना
**सन्मा. श्री.प.म.राऊत सर (संचालक)**



आदरणीय **राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.कलाम** यांच्या हस्ते
२००१ चा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार स्विकारताना
माजी प्राचार्या विकास हायस्कूल ज्युनि. कॉलेज,
संस्थेच्या विश्वस्त सी.ई.ओ.,
**कै. श्रीम. विद्या प. राऊत मॅडम**



**श्री. शिवाजी ज्ञानपीठ (इंटरनॅशनल), मुंबई या संस्थेतर्फे**
**पेशवा मोरोपंत पिंगळे जीवनगौरव पुरस्कार, २०१८**
**स्विकारताना संस्थापक अध्यक्ष गुरुवर्य श्री. प. म. राऊत सर**



**संस्थेचे अध्यक्ष आदरणीय श्री. . श्री.प.म.राऊत सर यांच्या सहस्त्रचंद्र दर्शन सोहळ्या निमित्त संस्थेच्या उभारणीच्या काळामध्ये महत्त्वाचे योगदान दिलेल्यापैकी काही माजी शिक्षकांना "गुरुवर्य पुरस्कार २०१८" प्रदान करण्यात आला.**

## मार्गदर्शक तत्वे

१. विकसनशील शैक्षणिक संस्था हे सशक्त समाजाचे प्रतीक आहे. पर्यायाने प्रगतीशील राष्ट्राच्या वाटचालीकडे दिशादर्शकाचे काम शैक्षणिक संस्था करत असतात. विद्या विकास एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे एकमेव उद्दिष्ट सर्व वयोगटाच्या विद्यार्थ्यांना जीवन शिक्षण प्राप्त करुन देणे हे आहे.

२. विद्यार्थी हा समाजाचा महत्त्वपूर्ण घटक आहे. त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्यांच्या संवेदनशील मनात आपले कुटुंब, शाळा व राष्ट्र यांविषयी विधायक व सौंदर्यपूर्ण दृष्टीकोन व आस्था निर्माण करणे यासाठी शाळेच्या प्रयत्नांना पालकांच्या सहकार्याची आवश्यकता आहे.

३. स्वच्छता, नियमितपणा, प्रामाणिकपणा, टापटीपपणा, शिस्तप्रियता, कृतज्ञता व सद्वर्तन इ. गुणांचा अंतर्भाव विद्यार्थ्यांच्या मानसिकतेत व वर्तनात बदल करण्याची जबाबदारी शाळेसोबत पालकांनीही अंगिकारावी.

४. अन्न, वस्त्र, निवारा याप्रमाणेच शिक्षण मानवाचा मूलभूत अधिकार आहे. प्रत्येकाने एक जबाबदार समाजघटक म्हणून हा अधिकार प्राप्त करुन घेतला पाहिजे व इतर सामाजिक कर्तव्य पूर्ततेकडे लक्ष दिले पाहिजे.



भारत
राजकीय नकाशा
ताजिकिस्तान
अफगाणिस्तान
पा कि स्ता न
ची न
(तिबेट)
लडाख
लेह
श्रीनगर
जम्मू व काश्मीर
जम्मू
हिमाचल प्रदेश
शिमला
पंजाब
चंडीगड
देहरादून
उत्तराखंड
हरियाणा
दिल्ली
नवी दिल्ली
ने पा ळ
सिक्किम
गंगटोक
भू ता न
अरूणाचल प्रदेश
इटानगर
उत्तर प्रदेश
लखनौ
जयपूर
राजस्थान
दिस्पुर
आसाम
नागालँड
कोहिमा
शिलाँग
मेघालय
बिहार
पटना
मणिपूर
इम्फाल
बांगलादेश
अगरतला
त्रिपुरा
आयझॉल
मिझोरम
झारखंड
रांची
पश्चिम बंगाल
कोलकाता
गांधीनगर
गुजरात
भोपाळ
मध्य प्रदेश
छत्तीसगड
रायपूर
म्यानमार
(बर्मा)
भुवनेश्वर
ओडिशा
दमण
दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव
मुंबई
महाराष्ट्र
बंगालचा खाडी
तेलंगणा
हैदराबाद
यानम (पुडुचेरी)
अमरावती
अरबी समुद्र
पणजी
गोवा
कर्नाटक
आंध्र प्रदेश
अंदमान आणि निकोबार बेटे (भारत)
बेंगलुरु
चेन्नई
पोर्ट ब्लेअर
लक्षद्वीप (भारत)
माहे (पुडुचेरी)
पुडुचेरी
कावरट्टी
केरळ
तामिळनाडू
कराईकल (पुडुचेरी)
पालक सामुद्रधुनी
आंतरराष्ट्रीय सीमा
राज्य/केंद्रशासित प्रदेश सीमा
देशाची राजधानी
राज्य/केंद्रशासित प्रदेश राजधानी
तिरूवनंतपुरम
श्रीलंका
Map not to Scale
हिं दी म हा सा ग र
Copyright © 2020 www.mapsofindia.com

भारताची राजमुद्रा

# भारतीय संविधान

## प्रास्ताविका

**आ**म्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;

आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करुन
स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

## ॥ वन्दे मातरम् ॥

**सुजलां सुफलां मलयज शीतलाम्**

**सस्य शामलां मातरम् वंदे मातरम् ॥**

**शुभ्रज्योत्सनां-पुलकित-यामिनीम् ।**

**फुल्लकुसुमित्-द्रुमदल-शोभिनीम ।**

**सुहासिनीं,सुमधुर-भाषिणीम् ।**

**सुखदां,वरदां,मातरम् वंदे मातरम् ॥**

**- बंकीमचंद्र चटोपाध्याय**

## राष्ट्रीय गीताचा भावानुवाद

हे भारतमाते! आम्ही तुला वंदन करतो.

तू उत्तम जलांनी संपन्न असलेली व धनधान्यांनी समृध्द आहेस.

मलय पर्वतावरुन येणाऱ्या सुगंधित वायुलहरींनी तू शीतल झाली आहेस.

विपूल शेतीमुळे हे माते! तू सावळी दिसत आहेस.

पांढऱ्याशुभ्र चंदेरी चांदण्यांमुळे तुझ्या रात्री प्रफुल्लित असतात.

फुलांच्या बहरांमुळे हे मातृभूमी! तू वृक्षलतांचे वस्त्र परिधान केल्यासारखी शोभायमान दिसतेस.

सदा हसतमुख आणि मधूर बोलणारी तू आम्हाला सदैव सुखदायिनी व वरदायिनी आहेस.

हे मातृभूमी! आम्ही तुला वंदन करतो.

## ॥ जनगनमन अधिनायक ॥

जन-गण-मन अधिनायक जय हे,भारत-भाग्य-विधाता।

पंजाब,सिंध,गुजराथ,मराठा,द्राविड,उत्कल,बंग,

विन्ध्य,हिमाचल,यमुना-गंगा,उच्छल जलधि तरंग;

तव शुभ नामे जागे ;

तव शुभ आशिष माँगे ;

गाहे तव जय गाथा।

जन-गण-मंगलदायक जय हे,भारत-भाग्य-विधाता॥

जय हे, जय हे, जय हे,

जय जय जय, जय हे॥ - गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर

## राष्ट्रगीताचा मराठी भावानुवाद

तू जनता हृदयाचा स्वामी आहेस.

तू भारताचा भाग्योदय करणारा परमेश्वर आहेस.

तुझ्या शुभ नामघोषाने पंजाब, सिंध, गुजराथ, महाराष्ट्र, द्राविड, ओरिसा, बंगाल हे प्रांत आणि विंध्याद्री, हिमाचल व गंगा - यमुनेचे जलतरंग, तसेच उसळी मारणाऱ्या समुद्राच्या लाटाही जागृत होतात. तुझे शुभाशिर्वाद मागतात. तुझ्या यशोगानाची गाथा गातात, तुझ्या नामाचा जयघोष करतात. सर्व जनतेचे मंगल करणारा भारताचा स्वामी आहेस.

तुझा जयजयकार असो !




## महाराष्ट्र राज्य
## राजकीय नकाशा

# <u>आपले महाराष्ट्र राज्य</u>

- स्थापना-१ मे १९६०
- राज्यभाषा – मराठी
- एकूण तालुके – ३५३
- पंचायत समित्या – ३५१
- एकूण जिल्हा परिषद – ३३
- आमदार विधानसभा – २८८
- आमदार विधानपरिषद – ७८
- महाराष्ट्र लोकसभा सदस्य – ४८
- समुद्र किनारा – ७२० कि.मी.
- नगरपालिका – २३०
- महानगरपालिका – २६
- शहरी भाग – ४५%
- ग्रामीण भाग – ५५%
- लोकसंख्या बाबतीत – २ रा क्रमांक
- क्षेत्रफळात – ३ रा क्रमांक
- संपूर्ण साक्षर १ला जिल्हा – सिंधुदूर्ग
- सर्वात कमी साक्षर जिल्हा – नंदूरबार
- महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकसंख्या - मुंबई उपनगर
- महाराष्ट्रातील सर्वात कमी लोकसंख्या – नंदूरबार
- महाराष्ट्रातील सर्वाधिक जंगले असलेला जिल्हा – गडचिरोली
- महाराष्ट्रातील कमी जंगल असलेला जिल्हा – बीड
- महाराष्ट्रातील सर्वाधिक आदिवासी असलेला जिल्हा - नंदूरबार
- महाराष्ट्रातील अधिक तलावांचा जिल्हा – गोंदिया
- महाराष्ट्रातील क्षेत्रफळाने सर्वात मोठा जिल्हा – अहमदनगर
- महाराष्ट्रातील क्षेत्रफळाने सर्वात लहान जिल्हा - मुंबई शहर
- महाराष्ट्रातील उंच शिखर – कळसूबाई (१६४६ मी )
- महाराष्ट्रातील सर्वात लांब नदी – गोदावरी
- महाराष्ट्रातील सर्वान लहान राष्ट्रीय महामार्ग – न्हावाशेवा पळस्पे २७ किमी
- महाराष्ट्रातील सर्वात जुनी नगरपालिका - रहिमतपूर (सांगली)
- गोदावरी नदीवरील पहिले मातीचे धरण – गंगापूर
- महाराष्ट्रात सर्वात जास्त समुद किनारा लाभलेले शहर – मुंबई
- जगातील पहिले जैव तंत्रज्ञान विदयापीठ - नागपूर
- भारतातील सर्वात मोठे नैसर्गिक बंदर – मुंबई

# सरस्वती स्तवन

या कुन्देन्दु-तुषारहार-धवला या शुभ्र-वस्त्रांवृता |

या वीणा वर दण्ड-मण्डितकरा या श्वेत-पद्मासना ||

या ब्रह्मच्युत शंकर प्रभृतिभि : देवै : सदा वन्दिता |

सा मां पातु सरस्वती भगवती नि:शेष जाडया: पहा ||

## सरस्वती स्तवन भावानुवाद

कुंद,चंद्र व हिमतुषार यांच्या सारखा,

जिचा वर्ण आहे, जी शुभ्र वस्त्रांनी आवृत्त आहे,

जिचे हस्त सुंदर वीणेने अलंकृत आहे,

जी श्वेत कमलावर बसली आहे,

जिची ब्रह्म-विष्णू-महेशादी सर्वकाल वंदना

करीत आहेत आणि जी सर्व प्रकारच्या

जडतेचा नाश करणारी आहे.

अशी सरस्वती देवी माझे रक्षण करो.

# || श्री ज्ञानेश्वरी ||

## || पसायदान ||

आतां विश्वात्मका देवें || येणें वाग्यंज्ञे तोषावें || तोषोनि मज द्यावें || पसायदान हें || १ ||

जे खळांची व्यंकटी सांडो || तयां सत्कर्मी रति वाढो || भूता परस्परें पडो || मैत्र जीवाचें || २ ||

दुरितांचे तिमिर जावो || विश्व स्वधर्मसूर्ये पाहो || जो जें वांछील तो तें लाहो || प्राणिजात ||३ ||

वर्षत सकळ मंगळी || ईश्वरनिष्ठांची मांदियाळी || अनवरत भूमंडळी || भेटतु भूतां ||४ ||

चलां कल्पतरुंचे आरव || चेतना चिंतामणीचे गांव || बोलते ते अर्णव || पीयुषाचे ||५ ||

चंद्रमे जे अलांच्छन || मार्तंड ते तापहीन || ते सर्वाही सदा सज्जन || सोयरे होतु ||६ ||

किंबहुना सर्वसुखी || पूर्ण होवोनि तिहीं लोकी || भजिजो आदिपुरुखीं || अखंडित ||७ ||

आणि ग्रन्थोपजीविये || विशेषीं लोकीं इये || दृष्टादृष्टविजयें || होआवें जी ||८ ||

येथ म्हणे श्री विश्वेश्वरावो || हा होईल दानपसावो || येणे वरें ज्ञानदेवो || सुखिया जाला ||९ ||

## पसायदान भावानुवाद

आतां विश्वरुपीं देवानें या वाग्यंज्ञानें संतुष्ट होऊन मला असें पसायदान द्यावें खळांचा कुटिलपणा नाहींसा व्हावा,आणि त्यांची सत्कर्माच्या ठिकाणीं आवड वाढवावी व प्राण्यांची एकमेकांशी जीवाभावापासून मैत्री व्हावी. पापांचा अंधार जावा व विश्वात स्वधर्मरुपी सूर्याचा उदय व्हावा. प्राणिमात्रांत जो जें इच्छिल,तें त्याला प्राप्त होवो. संपूर्ण कल्याणाचा वर्षाव करणाऱ्या ईश्वरनिष्ठांचे समुदाय या भूतलावर निरंतर सर्व प्राण्यांना भेटोत. चालणाऱ्या कल्पतरुंचे बगीचे, सजीव चिंतामणीचे गांव व अमृताचे जे बोलणारे सागर आहेत, जे कलंकरहित चंद्र आहेत व जें उष्णतारहित सूर्य आहेत ते सज्जन सर्वांना नेहमी आवडते व्हावेत. सोयरे व्हावेत. त्रैलोक्य सर्व सुखाने पूर्ण होऊन, त्यानें आदिपुरुषांच्या ठिकाणीं अखंडित भजावें आणि महाराज, या मृत्यूलोकांत विशेषकरुन हा ग्रंथच ज्यांचे जीवन होऊन राहिला असेल, त्यांनी इहलोकींच्या व परलोकींच्या भोगांवर विजयी व्हावें, तेव्हां विश्वाचे प्रभुराय श्री निवृत्तिनाथ म्हणाले कीं, हा दानप्रसाद होईल. या वरानें ज्ञानदेव अंत:करणांत सुखी झाले.

# ई-वर्ग नियम

१. सत्राच्या 10 मिनिटांपूर्वी प्रत्येक मुलाने वर्गात प्रवेश केला पाहिजे.

२. चॅट बॉक्सचा असंबद्ध वापर टाळला पाहिजे.

३.प्रत्येक मुलास मायक्रोफोन नि:शब्द करणे आवश्यक आहे आणि कॅमेरा बंद करणे आवश्यक आहे. जोपर्यंत त्याला / तिला सशब्द करणे, उत्तर देणे किंवा व्हिडिओवर स्वत: ला सादर करण्यास सांगितले जात नाही.

४. शिक्षक पीपीटी / व्हिडिओ शिकवत असताना / सादर करत असताना विद्यार्थ्यांनी स्क्रीनचे सादरीकरण टाळले पाहिजे.

५. विद्यार्थ्यांनी ई-वर्गांसाठी नियमित असणे आवश्यक आहे.

६. एकदा वर्गात प्रवेश घेतल्यानंतर शिक्षकांनी वर्ग पूर्ण होईपर्यंत विद्यार्थी उपस्थित असणे आवश्यक आहे.

७. शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ च्या निकालापर्यंत सर्व संप्रेषण, नोट्स, धडे जतन करणे आवश्यक आहे.

घरी रहा सुरक्षित रहा

## नियम

- विद्यार्थ्यांनी शाळेच्या वेळेआधी १० मिनिटे हजर असावे. मधल्या सुट्टीत विद्यार्थ्यांना शाळेबाहेर जाता येणार नाही.
- उशीरा आलेल्या विद्यार्थ्यांस पालकांच्या सहीचे लेखीपत्र आणणे आवश्यक आहे. अन्यथा शाळेकडून या शिस्तभंगाची नोंद घेतली जाईल.
- बेशिस्त व गैरवर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव शाळेतून काढले जाईल.
- शालेय सामानाची नासधूस करणाऱ्या विद्यार्थ्यांस त्याचा खर्च भरुन दयावा लागेल.
- स्वत:ची वहयापुस्तके व वस्तू यासाठी विद्यार्थी स्वत:च सर्वतोपरी जबाबदार असेल.
- नागरी प्रशिक्षणाचा भाग म्हणून सहशालेय उपक्रमात सर्व विद्यार्थ्यांना सहभागी होणे आवश्यक आहे.गैरहजेरीकरिता कोणाचीही सबब ग्राहय धरली जाणार नाही.
- मुख्याध्यापकांच्या परवानगीशिवाय विद्यार्थ्यांनी कुठल्याही स्वरुपाची वर्गणी रक्कम (मदत, सहाय्यनिधी इ.) गोळा करु नये.
- पालकांनी आपल्या पाल्याची दैनंदिनी व प्रगतिपुस्तक यांतील नोंदी अथवा शेरा इत्यादी रोज तपासावे.
- विद्यार्थ्यांच्या हजेरीमध्ये शिस्त व नियमितपणा अंगिकारण्यासाठी पालकांनी शिक्षकांना साहाय्य करावे.
- शाळेतील संपर्कासाठी पालकांनी आपल्या पाल्याच्या नाव, वर्ग, तुकडी, विभाग इ.माहितीसह कार्यालयीन वेळेत मुख्याध्यापकांना भेटावे.
- शालेय कामकाजाच्या वेळेत पालकांनी शिक्षकांना भेटू नये. आवश्यक मार्गदर्शनासाठी पालकांनी शनिवार अथवा महिनाअखेरच्या दिवशी शिक्षकांना भेटावे.
- पालकांचे पत्ते शाळेच्या दप्तरी नोंदवलेले असतात. त्यातील बदल पालकांनी शाळेस कळवावेत.

# पालकांकरिता मार्गदर्शन

## आपल्या पाल्याच्या प्रगतीसाठी शाळेला सहकार्य करा :

- दात,डोळे,नाक यांची नियमित स्वच्छता करणे,रोजच्या रोज आंघोळ करणे,नियमित नखे काढणे,स्वच्छ कपडे (गणवेश) घालणे,या चांगल्या सवयी पाल्याला लागणे गरजेचे आहे.त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करा.
- पाल्याला स्वत:ची कामे स्वत: करण्याची लहानपणापासून सवय लावा.
- पाल्याला शाळेत नियमितपणे आणि वेळेवर पाठवा.
- पाल्याला रोज एक तास त्याच्या वयाच्या अनुरुप खेळ खेळण्याची संधी दया.
- शाळेतील कार्यक्रम/अभ्यास या विषयी दररोज माहिती घ्या.
- पाल्याला रोज अभ्यासाला बसवा.
- रेडिओ,टी.व्ही.वापरांवर नियंत्रण ठेवा परंतु शैक्षणिक ज्ञान वाढविणारे कार्यक्रम ऐकण्यास पाहण्यास उत्तेजन द्यावे.
- जेवतांना सर्व पदार्थ खाण्याची सवय लावा.
- एखादा चांगला छंद जोपासण्यासाठी पाल्याला मदत करा.
- घरात व घराबाहेर इतरांना मदत करण्याची सवय लावा.अधून मधून शाळेत या,शिक्षकांची भेट घ्या.आपल्या पाल्याच्या प्रगती विषयी त्यांच्याशी बोला.भेटण्याची वेळ सकाळ अधिवेशन १० ते १०.२०दुपार अधिवेशन १२ते १२.२०
- पत्ता बदलल्यास शाळेला कळविणे.
- पाल्य गैरहजर राहिल्यास दैनंदिनीमध्ये कारण लिहून दयावे.

## शाळेचे नियम:

- विद्यार्थ्यांने रोज येताना ठरवून दिलेला गणवेश घालूनच शाळेत आले पाहिजे.
- रोज शाळेत १० मिनिटे अगोदर उपस्थित रहावे.
- विद्यार्थ्याचे नाव काढावयाचे असल्यास लेखी अर्ज करावा व त्यात शाळा सोडण्याचे कारण नमूद करावे.

## विद्यार्थ्यांकरीता :

- शिक्षक शिकविताना लक्षपूर्वक ऐका व पहा.
- आपला अभ्यास मन लावून स्वत:च करा.
- शाळेत येताना शैक्षणिक साहित्य आणायला विसरु नका.
- तुमची कोणतीही अडचण वर्गशिक्षकांना सांगा.
- प्रगती पुस्तक मिळाल्यापासून पालकांची सही घेऊन तीन दिवसांच्या आत आणून द्या.
- स्वत:ची कामे स्वत: करा.

# शालेय सुट्ट्यांची यादी २०२०-२०२१

| अ. क्र | महिना | वार | तारीख | दिनविशेष | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ऑगस्ट | शनिवार | ०१-०८-२० | बकरी ईद | 1 |
| 2 | ऑगस्ट | बुधवार | १२-०८-२० | गोपाळकाला | 1 |
| 3 | ऑगस्ट | शनिवार ते गुरुवार | २२/०८/२०२० ते २७/०८/२०२० | गणेशोत्सव | 5 |
| 4 | सप्टेंबर | मंगळवार | ०१-०९-२० | अनंत चतुर्दशी | 1 |
| 5 | ऑक्टोबर | शुक्रवार | ०२-१०-२० | महात्मा गांधी जयंती | 1 |
| 6 | ऑक्टोबर | शुक्रवार | ३०-१०-२० | ईद-ए-मिलाद | 1 |
| 7 | नोव्हेंबर | बुधवार ते शनिवार | ११/११/२०२०ते २८/११/२०२० | दिवाळी | 16 |
| 8 | नोव्हेंबर | सोमवार | ३०-११-२० | गुरुनानक जयंती | 1 |
| 9 | डिसेंबर | गुरुवार ते शनिवार | २४/१२/२०२० ते २६/१२/२०२० | ख्रिसमस | 3 |
| 10 | जानेवारी | गुरुवार | १४-०१-२१ | मकरसंक्रांती | 1 |
| 11 | फेब्रुवारी | शुक्रवार | १९-०२-२१ | शिवजयंती | 1 |
| 12 | फेब्रुवारी | गुरुवार | ११-०३-२१ | महाशिवरात्र | 1 |
| 13 | मार्च | सोमवार | २९-०३-२१ | धुलीवंदन | 1 |
| 14 | एप्रिल | शुक्रवार | ०२-०४-२१ | गुड फ्रायडे | 1 |
| 15 | एप्रिल | मंगळवार | १३-०४-२१ | गुढीपाडवा | 1 |
| 16 | एप्रिल | बुधवार | १४-०४-२१ | डॉ.आंबेडकर जयंती | 1 |
| 17 | एप्रिल | बुधवार | २१-०४-२१ | रामनवमी | 1 |
| 16 | मे | सोमवार | ३/०५/२०२१ ते १३/०५/२०२१ | उन्हाळी सुट्टी | 37 |
| | | | | राखीव | 1 |
| | | | | एकूण सुट्ट्या | 76 |

**उत्सव**

| अ. क्र. | महिना | वार | दिनांक | दिनविशेष | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ऑगस्ट | शनिवार | १५-०८-२० | स्वातंत्र्य दिन | 1 |
| 2 | जानेवारी | मंगळवार | २६-०१-२१ | गणतंत्र दिवस | 1 |
| 3 | मे | शनिवार | ०१-०५-२१ | महाराष्ट्र दिन | 1 |
| | | | | एकूण उत्सव | 3 |

स्वामी शामानंद एज्युकेशन सोसायटी

# स्वामी शामानंद प्राथमिक मराठी शाळा-स्थापना-२००४

## मान्यता प्राप्त विनाअनुदानित प्राथमिक शाळा महानगरपालिका

दि. 08/06/2020

### ❖ पालकांस सूचना

- उन्हाळी सुट्टी २ मे २०२० ते १३ जून २०२० पर्यंत आहे
- उन्हाळी सुट्टी नंतर शाळा १५ जून २०२० रोजी सुरु होईल. पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांची उपस्थिती आवश्यक आहे . शाळा दुपार अधिवेशन १२.४० ते ६.00 असे राहील
- दीर्घकाळ सुट्टी नंतर शाळेत पहिल्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांची हजेरी आवश्यक आहे
- आपली पराठ्मिक शाळा मान्यता प्राप्त विनानुदानित शाळा आहे.
- पावसाळ्यात सर्व विद्यार्थ्यांनी काळे सडल वापरावे. दिवाळी सुट्टी नंतर काळे कापडी बूट व काळे मोजे वापरावे. लेदर चे बूट वापरू नये.
- इ.१ली ते इ. ४ थी पर्यंत सर्व विद्यार्थ्यांसाठी ठरविलेला गणवेश घालणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यांना शाळा सोडल्याचा दाखला किंवा इतर कागदपत्रे हवी असल्यास पालकांनी १० मे २०२० पर्यंत अर्ज करावा.
- कार्यालयातून कागदपत्रे हवी असल्यास किंवा कागदपत्रावर सही हवी असल्यास तसा अर्ज दोन दिवस अगोदर कार्यालयात करावा. सुट्टीच्या कालावधीत शालेय कामकाजाची वेळ सकाळी १० ते २ अशी राहील
- इ.४थी पास झालेल्या विद्यार्थ्यांना स्वामी शामानंद हायस्कूल (माध्यमिक विभाग) इ.५वीत प्रवेश घेणे आवश्यक आहे. प्रवेशाचे काम दि. १० मे २०२० पर्यंत स. १०.०० ते दु. २.०० या वेळेत चालू राहील.
- आमच्या शाळेत शिशुवर्गापासून इ.१० वी पर्यंत सेमी इंग्रजीतून शिक्षण दिले जाते.
- महिनाअखेरच्या दिवशी शाळा सुटल्यानंतर पालकांनी शिक्षकांना भेटून आपल्या पाल्याच्या प्रगतीची चौकशी करावी (भेटण्याची वेळ दुपारी - ४ ते ५)
- विद्यार्थ्यांची फी भरण्याची वेळ सकाळी १० ते दुपारी २ अशी राहील. फी प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी भरावी त्यानंतर विलंब शुल्क आकारण्यात येईल.
- संस्थेकडे बी. एम. सी.च्या भाडे तत्वावर १५ वर्ग खोल्या असून त्याचे वार्षिक भाडे रु.४,३२,१६४/- आहे.
- अखिल भटवाडी मंडळ १,६८,००० /- माणिकलाल रु. १,५०,२३८/- इतके भाडे भरावे लागते त्याचा भार संस्थेवर पडत असतो शासन सदर भाडे देते नाही थामुळे हा निधी संस्थेला भरावा लागतो
- पालकांचे सहकार्य नेहमीच मिळाले आहे याबद्दल संस्था आभारी आहे.

➢ **वार्षिक शैक्षणिक कार्याचा अहवाल २०१९-२०**

- मुलांच्या विविध सुप्त गुणांचा विकास होण्या साठी शाळा विविध स्पर्धा आयोजित करते त्यातील गुणवंत विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे
- **आषाढी एकादशी संतांच्या गोष्टी**

  **इ.१ ली. १.** सेजल कदम २. श्रीशा पायांगण **इ.२ री. १.** पूजा कांबळे २. स्वरा भांडारकरúú **इ.३ री.१.** पूजा कांबळे२. रोहित जाधव **इ.४ थी.-१** अनिशा शिंदे **२.** प्रज्ञा वैराळ
- **गुरुपौर्णिमा गुरुशिष्यांच्या गोष्टी**

  **इ.२ री.१.** तनया कुलयेýú **२.** स्वरा भांडारकरúú **इ.३ री.१** अनन्या मांडवकर २.सागर साबळे **इ.४ थी १.** अंतरा वायाळ २. यश दोडकडे

लोकमान्य टिळक पुण्यतिथी हस्ताक्षर / वक्तृत्व स्पर्धा

**इ.१ ली. १.** रिद्धी साळवी २. स्मिती महाडिक **इ.२ री. १.**गौरांग घाडीगावकर 2. यश साळवी

**इ.३ री.१..**विधी हाटे 2.सार्थक काबुदले **इ.४ थी १.** यश सकपाळ 2. मानसी मनवे

- **महात्मा गांधी जयंती चित्रकला स्पर्धा**

**इ.१ ली. १..** निकिता दहीवडे 2.आरोही नवाळेú **इ.२ री.१.** नितीन ढेबे 2.मंजिरी काष्टे

**इ.३ री.१.** निरव पवार 2.सागर साबळे **इ.४ थी १.** .निधी भागडे 2.प्रतीक्षा जमदाडे

- **निबंध स्पर्धा**

**इ.३ री.१.** श्रुतिका नेमाने 2.निल भुवड **इ.४ थी १.** श्रेयश बाईत 2.श्रेया मांडवकर

- **गणेश उत्सव मातकाम स्पर्धा**

**इ.१ ली. १..**मेहेक कडू 2.आरोही नवाळेú **इ.२ री. १.**नितीन ढेबे 2. अनुष्का वाघमारे

**इ.३ री.१..**समर्थ सकपाळ ÷2.रोहित जाधव **इ.४ थी १.** अक्षता रोकडे 2.श्रावणी डिगे

- **दिवाळी वही सजावट स्पर्धा**

**इ.१ ली. १.** वैदवी घोंगे 2.श्रावण रावणगú **इ.२ री. १.**आर्या दुर्गवली õ2.स्वरा गुरव **इ.३ री.१.**सोहम चाळके2. सार्थक काबुदले **इ.४ थी १.** श्रेयस बाईत 2.यश दोडकडे

- **नाताळ कोलाजकाम**

**इ.१ ली. १.** वैदवी घोंगे2. अदिती साळेकर**इ.२ री. १.**नितीन ढेबेõ2.दुर्मिला आखाडे

**इ.३ री.१. .अनुष्का गोडसे**2. रोहित जाधव<. **इ.४ थी १.** .निधी भागडे2.क्रिष्णा विश्वकर्मा

- **सावित्रीबाई फुले जन्मदिन रांगोळी स्पर्धा**

**इ.१ ली. १..**गौरी केदारे २. मनस्वी पळसमकरúú **३.**सेजल कुबल ४. व्रितिका अहिरे **इ.१ ली. १.** १.स्मिती महाडिक २.स्वरा मोरे ३.श्रेया मोहरे ४.निकिता दहीवडे **इ.२ री. १.**.आर्या दुर्गवली **२.** कोमल वरवटकर **३.** तनया कुलये **इ.२ री. २.** स्वरा भांडारकर **२.** स्वरा गुरव **३.** दुर्मिला आखाडे **इ.३ री.१..**हर्षदा गुडेकर 2.सागर साबळे सार्थक काबुदले शैलेश जानकर सक्षम मुकनाक÷**इ.४ थी १.** निधी भागडे श्रावणी भुवड 2.गौरी पळसमकर पूजा निकम मानसी मनवे रुद्राणी माटल

**मकरसंक्रांत हस्ताक्षर स्पर्धा**

**इ.१ ली. १.**रिद्धी साळवी ú2.अदिती साळेकर **इ.२ री. १.** गौरांग घाडीगावकर 2.वैदही गोरड

**इ.३ री.१.**चैतन्य चौकेकर 2.रोहित जाधव **इ.४ थी १.** यश सकपाळ 2.प्राविण्या वैराळ

- **क्रीडा स्पर्धा**–२३ व २४ डिसेंबर २०१९ रोजी प्राथमिक विभागाच्या वैयक्तिक व सामुहिक स्पर्धा घेण्यात आल्या. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रके देण्यात आली.
- **सन व उत्सव समारंभ -** संस्कृती जतन करण्यासाठी वर्षभरामध्ये साजरे केलेले सन उदा. आषाढी एकादशी , गुरुपोर्णिमा , नागपंचमी , रक्षाबंधन, दहीहंडी , सरस्वती पूजन , दिवाळी , मकरसंक्रांत ,हळदीकुंकू ,शिक्षकदिन , स्वातंत्र दिन ,बालदिन इत्यादी उत्सव उत्साहाने साजरे करण्यात येतात.
- **सहशालेय उपक्रम -** विद्यार्थी निर्मित राखी प्रदर्शन, टाकाऊतून टिकाऊ वस्तू तयार करणे, विज्ञान दिनी इ.१ ली. ते ४ थी. विद्यार्थी प्रयोग सादरीकरण, शिवजयंती उत्सव , भाषा दिन , इंग्रंजी संभाषण उपक्रम , शिक्षकासाठी संस्थेतर्फे प्रशिक्षणे आयोजित केली जातात.गुडीपाडवा , लोहगड, ता. मावळ येथे प्रतिवर्षी संस्थेतर्फे साजरा करण्यात येतो.
- **बक्षिस समारंभ-** वर्षभरात घेण्यात येणाऱ्या स्पर्धांसाठी प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रशस्तीपत्रके व बक्षिसे देण्यात येतात.
- इयता १ ली मध्ये प्रवेश घेणाऱ्या बौद्ध अथवा नवबौद्ध तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा जातीचा दाखला सोबत जोडणे आवश्यक आहे.
- संस्था प्रतिनिधी श्रीम.माधवी नांदोसकर मडम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या गुणवंता वाढीसाठी विविध उपक्रम राबविले जातात.
- स्वामी शामानंद मोफत वैद्यकीय केंद्रातर्फे विद्यार्थ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी केली जाते.
- सन २००८ पासून संगणक विषय इ. १ ली. ते इ ४ थी वर्गास सुरु करण्यात आला असून संगणक कक्ष सुसज्ज आहे . त्यासाठी वार्षिक फी रु. ५००/- राहील.
- सन २०२०-२१ हे शैक्षणिक वर्ष सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना उज्ज्वल यशाचे जावो, ही सदिच्छा.

## सर्व पालकांनी केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद!.

| श्रीम. अनामिका पाटील | श्रीम.माधवी नांदोसकर | श्री.विकास राऊत | श्री.प.म. राऊत |
|---|---|---|---|
| मुख्याध्यापिका | संस्था प्रतीनिधी | संचालक | अध्यक्ष |

# शालेय व सहशालेय उपक्रम

## सन २०२०-२०२१

- **विविध परीक्षा**-महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा.

- **आंतरशालेय स्पर्धा** - संस्कृती कलादर्पण विविध स्पर्धा ,कला चिल्ड्रनअकॅडमी विविध स्पर्धा,कलादर्पण स्पर्धा आयोजित विविध स्पर्धा ,ललित कला अकादमी स्पर्धा ,कबबुलबुल मेळावा.

○

- **शालेय स्पर्धा**- वक्तृत्व ,हस्ताक्षर, कथाकथन ,चित्रकला ,हस्तकला, गायन, क्रीडा ,काव्यवाचन ,स्मरणशक्ती स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, श्रुतलेखन स्पर्धा, ठसेकाम स्पर्धा ,कोलाज काम , चित्र रंगवणे, वेशभूषा स्पर्धा, पिशवी तयार करणे.

- **विविध उपक्रम**-कबबुलबुल शिबिर,योगदिन, वृक्षारोपण, स्थानिक ठिकाणांना भेटी, पालक सभा वर्गवार ,पालक-शिक्षक संघ सभा ,प्रवेशोत्सव ,शाळा व्यवस्थापन समिती सभा, विद्यार्थ्यांचे हस्तलिखित मासिक, इंग्लिश स्पीकिंग उपक्रम, गणित अध्ययन कृती उपक्रम, विज्ञान प्रयोग प्रात्यक्षिक उपक्रम ,भाषा उपक्रम ,प्रजासत्ताक दिन ,गांधी जयंती ,स्वातंत्र्यदिन ,शिवजयंती ,वाचन प्रेरणा दिन ,नागपंचमी, रक्षाबंधन, संविधान दिन, बालिका दिन ,लोकमान्य टिळक जयंती, पुण्यतिथी, बालदिन, गणेशोत्सव ,गोपालकाला दसरा, दिवाळी, होळी ,नाताळ.

### सर्वंकष मूल्यमापन

| इयत्ता परीक्षा नियोजन | आकारिक मूल्यमापन | संकलित मूल्यमापन | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | तोंडी/प्रात्यक्षिक | लेखी | |
| **पहिली व दुसरी** | ७०% | १०% | २०% | १००% |
| **तिसरी व चौथी** | ६०% | १०% | ३०% | १००% |

### आकारिक मूल्यमापन भारांश(नमुना तक्ता)प्रथम/द्वितीयसत्र

| इयत्ता निहाय गट | तपशील विषय | आकारिक मूल्यमापनासाठीची साधने | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दैनंदिन निरीक्षण | तोंडी काम | प्रात्यक्षिक/ प्रयोग | उपक्रम/ कृती | प्रकल्प | चाचणी | स्वाध्याय / वर्गकार्य | इतर | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इ,१ली,<br>२ री | प्रथम भाषा<br>इंग्रजी<br>गणित | | १५<br>२०<br>१० | ५<br>२०<br>१० | १०<br>२०<br>१० | १०<br>-<br>१० | २०<br>-<br>२० | १०<br>२०<br>१० | -<br>२०<br>- | ७०<br>१००<br>७० |
| इ.3री,<br>४थी | प्रथम भाषा<br>इंग्रजी<br>गणित<br>सामान्य वि. | | १०<br>१५<br>५<br>१० | -<br>१०<br>५<br>१० | १०<br>१०<br>१०<br>- | १०<br>-<br>१०<br>१० | २०<br>२०<br>२०<br>२० | १०<br>५<br>१०<br>१० | -<br>-<br>-<br>- | ६०<br>६०<br>६०<br>६० |
| इ,१ली,<br>२ री | कला<br>कार्यानुभव<br>शा.शिक्षण व<br>आरोग्य | | ५<br>५<br>५ | ६०<br>६०<br>६० | १५<br>१५<br>१५ | १०<br>१०<br>१० | -<br>-<br>- | ५<br>५<br>५ | ५<br>५<br>५ | १००<br>१००<br>१०० |
| इ.3री,<br>४थी | कला<br>कार्यानुभव<br>शा.शिक्षण व<br>आरोग्य | | २०<br>१०<br>१० | ५०<br>६०<br>६० | १०<br>१०<br>१० | १०<br>१०<br>१० | -<br>-<br>- | १०<br>१०<br>१० | -<br>-<br>- | १००<br>१००<br>१०० |

## परीक्षा नियोजन २०२०-२०२१

पायाभूत चाचणी - जुलै पहिला आठवडा

प्रथम घटक चाचणी - ऑगस्ट दुसरा आठवडा

प्रथम सत्रांत परीक्षा - ऑक्टोबर पहिला दुसरा आठवडा

द्वितीय घटक चाचणी - जानेवारी चौथा आठवडा

द्वितीय सत्रांत परीक्षा - मार्च शेवटचा व एप्रिल पहिला आठवडा

**टीप: परीक्षा नियोजनामध्ये बदल करण्याचे अधिकार मुख्याध्यापकांचे राहतील.**

**पालकसभा**

पहिली पालकसभा - जून शेवटचा आठवडा

दुसरी पालकसभा - सप्टेंबर तिसरा आठवडा

तिसरी पालकसभा -डिसेंबर पहिला आठवडा

चौथी पालकसभा -फेब्रुवारी तिसरा आठवडा

**पालक- शिक्षक संघ सभा**

पहिली पालकसभा - जून शेवटचा आठवडा

दुसरी पालकसभा - सप्टेंबर तिसरा आठवडा

तिसरी पालकसभा -डिसेंबर पहिला आठवडा

चौथी पालकसभा -फेब्रुवारी तिसरा आठवडा

शाळा व्यवस्थापन सभा प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात होईल.

# स्वामी शामानंद हायस्कूल

## प्राथमिक विभाग

## मराठी माध्यम

### शाळेची वेळ

**सोमवार ते शुक्रवार**

दुपार अधिवेशन :१२:४० ते ६. ००

मधली सुट्टी : ३:१५ते 3:४०

**शनिवार**

दुपार अधिवेशन :१२:४० ते ४:२०

महिना अखेर

दुपार अधिवेशन :१२:४० ते ३.१५

---

### फी घेण्याचे वेळापत्रक

**सोमवार ते शुक्रवार :** सकाळी १० :०० ते दुपारी १:००

सर्व कामाचे दिवस फी काउंटर सुरू राहील.

---

### पालकांनी मुख्यांना भेटण्याची वेळ

**सकाळी १२ :०० ते दुपारी १:००**

# स्वामी शामानंद प्राथमिक विभाग

## समित्या प्रमुख : २०२०-२१

- सांस्कृतिक मंडळ प्रमुख : १. श्रीम. अदिती सावंत २. श्रीम. अमृता डाकी
- क्रीडा प्रमुख : १. श्री. संतोष कराड २. श्री. संजय मालोरे
- फलक लेखन प्रमुख : १. श्रीम. अमृता डाकी २. श्रीम. मीरा काळदाते
- शालेय स्पर्धा प्रमुख : १. श्रीम. सुरभी शेडगे २. श्रीम. अवनी महादये
- अहवाल लेखन प्रमुख : १. श्रीम. अमृता डाकी २. श्रीम. अदिती सावंत
- अंतर्गत परीक्षा प्रमुख : १. श्रीम. सुरभी शेडगे २. श्री. संजय मालोरे
- बाह्य परीक्षा प्रमुख : १. श्री. संजय मालोरे २. श्री. संतोष कराड
- हस्तलिखित प्रमुख : १. श्री. संतोष कराड २. श्री. संजय मालोरे
- प्रजासत्ताक दिन : १. श्रीम. मीरा काळदाते २. श्रीम. अदिती सावंत
- स्वातंत्र्य दिन : १. श्रीम. अदिती सावंत २. श्री. संतोष कराड
- फोटो संग्रह प्रमुख : १. श्री. संजय मालोरे २. श्रीम. मीरा काळदाते
- कार्यक्रम प्रमुख : १. श्रीम.अनामिका पाटील २. श्रीम. सुरभी शेडगे
- महिला तक्रार निवारण समिती : १. श्रीम. माधवी नांदोसकर २. श्रीम.अनामिका पाटील ३. श्रीम. सुरभी शेडगे

# सुविचार

१.  उच्चारावरून विद्वत्ता आवाजावरून नम्रता आणि वर्तनावरून शील समजते.
२ . अपयशाच्या कठीण खडकाखाली यशाच्या पाण्याचा झरा असतो.
3.  चारित्र्याचा विकास हेच खरे शिक्षण.
४.  जीवन फुलासारखे असू द्या व ध्येय मात्र मधमाशीसारखे ठेवा.
५.  जीवन ही चैनीची वस्तू नसून कर्तव्याची भूमी आहे.
६.  त्याग हा जीवन मंदिराचा कळस आहे.
७.  विनय (नम्रता )हा गुण सर्व सद्गुणांचा अलंकार आहे.
८.  मोठी माणसे आलेल्या संधीचा कधीच दुरुपयोग  करीत नाही.
९ . अनुभव हा महान शिक्षक आहे ,पण तो मोबदला मात्र फार घेतो .
१०. पुस्तके व मित्र हे थोडकेच असावे पण ते चांगले असावेत.
११. संकटे पाहून जो घाबरत नाही तोच खरा  माणूस.
१२. शरीराला जसे व्यायाम तसे मनाला वाचन.
१३.  ध्येयामागे धावताना लोकनिंदेकडे लक्ष देऊ नका.
१४. पुस्तके ही काळाच्या विशाल सागरातून आपणास घेऊन जाणारी जहाजे  होत.
१५. वाचनासाठी वेळ काढा तो शहाणपणा निर्झर आहे.
१६  विद्या विनयेन शोभते.
१७. मनुष्य मरेपर्यंत विद्यार्थी असतो.
१८.  देवभक्तीहून देशभक्ती श्रेष्ठ आहे .
१९. व्यवस्था व शिस्त ही शाळेची शोभा आहे.
२०. जो कर्तव्याला जागतो, तो कौतुकास प्राप्त होतो.
२१. कला ही शहाण्याला वेडा आणि मूर्खाला शहाणा करते.
२२. संधीची वाट पाहू नका ती स्वतःच शोधा आणि कार्याला लागा.
२३. माणसाचे सर्वात मोठे शत्रू आहेत -आळस ,अज्ञान ,अंधश्रद्धा.
२४. तुलना करावी पण अवहेलना करू नये.
२५. विद्यार्थ्यांचे मनोरथ पूर्ण करणारी कल्पकता म्हणजे गुरुमाऊली होय.
२६. आत्मविश्वासाचा अभाव हेच अपयशाचे खरे कारण आहे.
२७. विचार थकले की विकार बळावतात.
२८. अभ्यासामुळे आनंद वाढतो ,भूषण प्राप्त होते व कार्यक्षमता वाढते.
२९. विचारांचा चिराग  विझला तर आचार आंधळा बनतो.
३०. सत्व हे सत्तेपेक्षा श्रेष्ठ आहे.
३१. अनेक अपयशातूनच यशाची निर्मिती होते.

## श्रीगणेश वंदन

प्रारंभी विनंती करू गणपती विद्या दया सागरा |
अज्ञानत्व हरोनी बुद्धी मती दे आराध्य मोरेश्वरा ||
चिंता क्लेश दुःख दारिद्र अवघे देशांतरा पाठवी|
हेरंबा गणनायका गजमुखा भक्ता बहु तोषवी ||

## लक्षात ठेवा.

१. सकाळी लवकर उठा .रात्री लवकर झोपा.

२. आपली कामे आपणच करा.

3. एकमेकांना मदत करा.

४. नियमितपणे एकाग्रतेने अभ्यास करा.

५. स्वच्छ व नीटनेटके राहा.

६. कमी बोला, जास्त काम करा.

७. वेळ वाया घालवू नका.

८. आपले काम अपुरे ठेवू नका.

९. वडीलधाऱ्या माणसांचे नम्रतेने वागा व त्यांचे ऐका त्यांना नमस्कार करा.

१०. नवे ज्ञान मिळवा खरे बोला.

११. भरपूर व्यायाम करा.

१२. मातृभूमीला बंधन करा.

१३ .मला चांगली बुद्धी दे अशी ईश्वरचरणी प्रार्थना करा.

## शिक्षणाची दिशा

परिपाठ- प्रार्थनेमुळे मन शुद्ध होते.

कला, कार्यानुभव- नवनिर्मितीचा आनंद.

शारीरिक शिक्षण- शरीर बलवान बनते.

संगणक- बदलत्या काळाशी समायोजन .

स्काऊट -गाईड- सेवाभाव

वाचनालय- ज्ञान.

भ्रष्टाचारासारख्या प्रवृत्तीला भस्म करण्यासाठी प्रेम ,सत्य, अहिंसा व संग्रहवृत्ती यांचा अंगिकार

वरील सप्त गुणांनी आपले जीवन सुखमय होईल.

# Prayer before class

O God, you have given me life and I know that you want me to make something worthwhile out of it .
Help me
To keep my body fit.
To keep my mind keen.
To keep my thoughts pure.
To keep my words clean and through.

## नित्यस्मरण

### १) प्रातः स्मरण

कराग्रे वसते लक्ष्मी करमध्ये सरस्वती
करमुले तू गोविंदम प्रभाते करदर्शनम् ||

### २) भूमाता स्मरण

समुद्र वसने देवी| पर्वतस्त नमंडले |
विष्णूपत्नी नमस्तुभ्य पादस्पर्श क्षमस्वमे ||

### 3) गुरुस्मरण

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु :| गुरुर्देवो महेश्वरा: |
गुरु साक्षात परब्रहम |तस्मै श्री गुरुवेनमः ||

### ४) प्रकाशदात्याचे स्मरण

आदितस्य नमस्कारनये कुर्वान्ति दिनेदिने |
जन्मान्तर सहस्त्रवु दारिद्र्यं नेपजायते ||

### ५) सायंस्मरण

शुभं करोती कल्याणम् |
आरोग्य धनसंपदा ||

## वारसा

गुरूने दिला ज्ञानरूपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा ||धृ||

पिता, बंधू स्नेही तुम्ही माऊली
तुम्ही कल्पवृक्षातली साऊली
तुम्ही सूर्य आम्हा दिला कवडसा ||१||

जगी दृष्ट कोणी करू शासना
गुणी सज्जनांचे करू पालन
मनी मानसी ध्यास आहे असा ||२||

शिकू, धिरता ,शूरता वीरता
धरु थोर विदये सवे नम्रता
मनी ध्यास आहे खरा हा वसा ||

## इयत्ता-- पहिली

**इयत्ता पहिली वार्षिक नियोजन २०२०- २१** **विषय : भाषा**

| महिने | घटक / उपघटक | साधंतंत्रे | उपक्रम | ई लर्निंग | स्वाध्याय |
|---|---|---|---|---|---|
| जून | शाळा वर्ग पूर्वतयारी, बडबड गीते<br>उजळणी- अक्षरे- शब्द वाचन , गाणी, गोष्टी | तोंडीकाम<br>कृतीकम | बडबड गीते संग्रह<br>पाऊस गीते मिळवा | | |
| जुलै | 1) कविता गायन- अग्गोबाई ढग्गोबाई<br>2) माझे खेळ<br>3) माझे कुटुंब चित्र बघ, गप्पा मार, पाठावर आधारित उपक्रम तोंडी (चित्र वर्णन)<br>4) वाचन व लेखन पूर्वतयारी -<br>चित्र बघ नाव सांग जोड्या जुळवा<br>उपक्रम लेखन पान 12, 13 बघ गिरव अवयव. | तोंडीकाम<br>कृतीकम<br>तोंडीकाम<br>कृतीकाम<br>तोंडीकाम<br>कृतीकाम<br>वर्ग कार्य | खेळांची चित्रे गोळा संग्रह करणे<br>कुटुंबातील व्यक्तींची नावे सांगा.<br>खेळांची चित्रे जमवा चिकटवा | 1 | 1 |
| ऑगस्ट | 1)चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव<br>क, म, आ, ल, या अक्षराने श्रवण, वाचन व लेखन, बघ ऐक व म्हण<br>कानाची संकल्पना<br>2) झोपाळा गेला उडून- बघ, ऐक, म्हण<br>माझी शाळा- चित्रात काय दिसते<br>3) इ, घ, र, ई, या अक्षराने श्रवण, वाचन, लेखन<br>चित्र बघ, नाव सांग, जोड्या जुळव, लहान व मोठी वेलांटी संकल्पना.<br>4)उपक्रम लेखन पान नं 26 व 27<br>शब्द वाच व लिही .<br>पाठ वाचन - 1 काका घरी आला<br>शब्द लेखन वाचन चित्र | तोंडीकाम<br>कृतीकाम<br>वर्ग<br>कृतीकाम<br>तोंडीकाम<br>कृतीकाम<br>वर्ग कार्य<br>तोंडीकाम<br>स्वाध्याय | स्वतःच्या नावच्या पट्ट्या तयार करणे<br>प्राण्यांचा आवाज ओळखा व चित्रे संग्रह करा<br>माझी शाळा माहिती सांगा<br>चित्रे काढा रंगवा | 1 | 1 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **सप्टेंबर** | 1)कविता- आई मला देना ना<br>उ, न, स, प, ऊ, त या अक्षराचे श्रवण, वाचन व लेखन.<br>उपक्रम- चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव, लहान व मोठा ऊकार संकल्पना<br>2) माझे शब्द माझे मित्र<br>उपक्रम पान नंबर 33 ,35<br>3) ए, च, ळ, ह, झ या अक्षरांचे श्रवण व वाचन व लेखन आणि उपक्रम<br>ए ची संकल्पना वाचन व लेखन<br>चित्र वर्णन बाजार- चित्रात काय काय दिसते<br>4)पूर्णविराम ओळख वाचन पाठ क्रमांक 2<br>द, ड, व, य, ऐ या अक्षरांचे श्रवण वाचन व लेखन आणि उपक्रम<br>ऐ ची संकल्पना वाचन व लेखन | तोंडीकाम<br>कृतीकाम<br>कृतीकाम<br>वर्गकार्य<br>कृतीकाम<br>वर्गकार्य<br>तोंडीकाम<br>कृतीकाम<br>वर्गकार्य | मी कोण होणार तोंडी सांगा?<br>चित्रे पहा, शब्द वाचा<br>मित्रांची नावे सांगा<br>वाचा, लिहा<br>चित्र वर्णन करा बाजार | 1 | 1 |
| **ऑक्टोबर** | उजळणी (जुलै ते सेप्टेंबर अभ्यासक्रम सराव पेपर सोडविणे )<br>तोंडी परीक्षा - गुण 10<br>प्रथम सत्र परीक्षा चाचणी - | तोंडीकाम | सारखी अक्षरे ओळखा<br>चित्र, शब्द, कार्ड वाचन | 1 | |
| **नोव्हेंबर** | उजळणी<br>3) ध, य, फ, ओ, ज, श या अक्षरांचे श्रवण वाचन व लेखन आणि उपक्रम<br>4) ओ संकल्पना वाचन व लेखन | तोंडीकाम<br>गट्चर्चा<br>कृती | सारखी अक्षरे ओळखा गोल करा. लपलेला शब्द शोधा | 1 | |
| **डिसेंबर** | 1)वाचनपाठ - 3, कविता - माझा घोडा, शब्दखेळ,<br>प्रश्नचिन्हांची ओळख. शब्द खेळ .<br>गाडी आली गाडी आली<br>2) ण, ख, थ, औ, भ या अक्षरांचे श्रवण, वाचन व लेखन आणि उपक्रम<br>औ ची संकल्पना वाचन व लेखन | तोंडीकाम<br>वर्गकार्य<br>तोंडीकाम<br>स्वाध्याय | चित्र शब्द कार्ड वाचन<br>पुरवणी वाचन<br>चित्र पहा, शब्द सांगा<br>फळांची चित्रे चिकटवा, नावे लिहा. | 1 | 1 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **जानेवारी** | 1) ट , ढ, ठ, च, ष अक्षरांचे श्रवण व वाचन व लेखन आणि उपक्रम .<br>2) कविता - वेड कोकरू<br>क्ष, ज्ञ, अ, अॅ, ऑ, अं, अः या अक्षरांचे श्रवण वाचन व लेखन आणि उपक्रम<br>3) अॅ, ऑ व अनुस्वार शब्द वाचन, लेखन स्वर चिन्हांचा वापर करून शब्द तयार करा . घटनाक्रम लावा .योग्य शब्द भरा.<br>4) जोडाक्षरे सराव वाचन लेखन | तोंडीकाम<br>कृतीकाम<br>वर्गकार्य<br>तोंडीकाम<br>गट्चर्चा<br>कृतीकाम<br>तोंडीकाम | चित्र पहा व शब्द सांगा.<br>अॅ, ऑ अक्षरापासून शब्द तयार करा.<br>लिहा | 1 | 1 |
| **फेब्रुवारी** | 1) वाचनपाठ क्रमांक - 4<br>चित्र बघ, गोष्ट तयार कर , सांग<br>रेघ लहान झाली - गोष्ट वाचन<br>हे करून बघ - उपक्रम<br>2) जंगलात ठरली मैफल<br>जोडाक्षरे सराव वाचन लेखन<br>3) माझा भारत वाचन<br>भारतीय प्रतीके<br>4) लिहूया वाचूया - चौदाखडी<br>अक्षरे व चिन्हे जोड शब्द तयार कर | नाट्यीकरण<br>तोंडीकाम<br>वर्गकार्य | रेघ लहान गोष्टींचे नाट्यीकरण करा | 1 | 1 |
| **मार्च / एप्रिल** | द्वितीय सत्र उजळणी<br>डिसेंबर ते फेब्रुवारी<br>अतिरिक्त पूरक मार्गदर्शन सराव<br>शब्द लेखन , वाचन करणे<br>सराव समृद्धी , संकलित मूल्यमापन<br>चाचणी 2 | | | 1 | 1 |

इयत्ता पहिली वार्षिक नियोजन २०२०- २१ विषय : Maths

| Month | Unit/Subunit | Techniques | Activity | E-learning | H.W |
|---|---|---|---|---|---|
| June | Revision - 1 to 10 | Oral work<br>Observation<br>Assignment | | - | - |
| July | 1)Part one - small-big , Behind - in front of<br>2)Above - Below<br>3) Earlier-Later<br>4)Understand and write - 1<br>Understand and write - 2 | Oral work<br>Observation<br>Practical<br>Assignment | Picture<br>Chart<br>Make cards | 2 | 1 |
| August | 1) Understand and write - 3<br>Understand and write - 4<br>2)Understand and write - 5<br>Understand and write - 6<br>3)Understand and write - 7<br>Understand and write - 8<br>Understand and write - 9<br>4)Count and Write Introduction and writing of zero<br>Less - More | Oral work<br>Observation<br>Assignment | Make cards | 2 | 1 |
| Sept. | Increasing - decreasing order<br>1) Let us “add” Addition of zero<br>Let us learn Subtraction<br>2)Introduction and writing of 10<br>Lets us learn ‘tens’<br>3)Introduction and writing of 11 to 20<br>Steps of “tens”<br>4)Coins and currency notes | Oral work<br>Observation<br>Practical<br>Assignment | Make bundle of tens using sticks<br>Coins and currency notes<br>Cards | 2 | 1 |
| Oct. | Exercises and revision first term exam | Oral<br>Practical<br>Assignment | | 1 | |
| Nov. | Introduction and writing of 21 to 30<br>3) Introduction and writing of 31 to 40<br>Introduction and writing of 41 to 50<br>Introduction and writing of 51 to 60<br>4) Introduction and writing of 61 to 70<br>Introduction and writing of 71 to 80 | Oral work<br>Observation<br>Practical<br>Assignment | Make bundle of tens using sticks<br>Make number cards | 2 | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Dec.** | 1)Introduction and writing of 81 to 90<br>Introduction and writing of 91 to 99<br>2)Introduction and writing of 100<br>Addition up to 20<br>3)Addition by counting forward<br>Pattern<br>4)In - out broad narrow<br>Identifying shapes | Oral work<br>Practical<br>Observation<br>Assignment | Make bundle of tens using sticks<br>Make number cards<br>Charts<br>Make different shapes | 2 | 1 |
| **January** | 1) Long short<br>Tall short<br>2) Heavy light<br>3) Less time more time<br>4)What is next<br>Practice<br>Measure the distance by so many object | Oral work<br>Observation<br>Practical<br>Assignment | Picture charts | 2 | 1 |
| **February** | 1) Let us measure practical<br>2) Days of the week<br>3) Make a chart of day and games<br>4) Let us observe and understand | Oral<br>Practical<br>Assignment | Make chart | 2 | 1 |
| **March** | Exercise and revision<br>1) See the picture and answer the question<br>2) Do the practice<br>3) Make the chart of objects | Oral work<br>Observation<br>Practical<br>Assignment | | 1 | 1 |
| **April** | Revision - Second term exam | | | | |

## इयत्ता पहिली वार्षिक नियोजन २०२०- २१ विषय : English

| Month | Lesson / Content | Techniques | Teaching aids | Activity | E-learning | H.W |
|---|---|---|---|---|---|---|
| **June** | शाळा वर्ग पूर्वतयारी गाणी गोष्टी<br>Revision- Rhymes | Oral work | Pictures | Pictures of English word | | |
| **July** | Unit 1 -<br>1)Welcome song<br>2)Greeting English word we know<br>3)Rolly Polly<br>Rhyming words<br>4)Words b,c,p,t<br>My name | Oral work<br>Activity<br>Oral work<br>Activity<br>Charts<br>Oral works | Pictures<br>Pictures<br><br>Pictures | Write your name on card<br><br>School bag | 2 | 1 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **August** | 1) Fun time<br>Unit 2 -<br>Humpty Dumpty<br>2)Action time<br>Let's talk<br>Daily words<br>3) Rain rain<br>Let's find<br>Unit 3 -<br>This is my head<br>4)Requests<br>Let's talk | Oral works<br>Oral works<br>Activity<br>Oral<br>activity<br>Oral work | Pictures<br>Pictures<br>Pictures<br>Pictures | | 2 | 1 |
| **September** | 1)Happy Birthday<br>My fruit basket<br>2)Let's know new words<br>Unit 4 -<br>Clap your hand<br>The game of addition<br>Row row row your boat<br>4)Let's speak<br>Two silly goats<br>Two wise goats | Oral works<br>Oral works<br>Oral work<br>Oral work | Pictures<br>Pictures<br>Pictures | Stick<br>pictures<br>write<br>Animal<br>names | 2 | 1 |
| **October** | Revision<br>Oral andFirst semister Written Exam. | | | | | |
| **November** | 3) Words a, e, i, o, u<br>Odd man out<br>Unit - 5<br>1) Number song<br>One and many<br>My grandfather Had a Farm<br>Word v, w, x, y, z. | Oral and<br>Activity<br>Orals<br>Charts | Pictures<br>Pictures | -<br>Charts<br>Cards | 1 | 1 |
| **December** | 1) In The street,Myself<br>2)Unit 6 -<br>Day of the week<br>3)We love vegetables<br>A Vegetable basket,My vegetables<br>4)Rainbow and colours<br>How are you,Let's play | Oral<br>Work<br>Orals<br>Orals<br>Work<br>Activity<br>Oral work<br>Oral | Charts<br>Cards<br>Calender<br>Pictures<br>Vegetables | Write days<br>of week<br>Colours<br>Name | 2 | 1 |
| **January** | 1)Unit 7 -<br>Twinkle Twinkle Little Star Farm<br>house<br>2)Let's talk<br>Brush your teeth,Good habits<br>3)Unit - 8<br>Who are you dear,Words bag<br>4)Bingo-Traffic signals | Oral work<br>activity<br>Oral work<br>Work<br>Oral work<br>Work<br>Activity<br>Oral | Pictures<br>-<br>Pictures<br>-<br>Words<br>Cards | -<br>- | 2 | 1 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **February** | 1)Dressing Dolly<br>2)Get ready for the school<br>3)The fox and crane<br>4)English letters | Oral<br>Activity<br>Activity | Pictures<br>Letter<br>Cards | | 2 | 1 |
| **March** | 1)School is over<br>2)Let's practice,Make chart<br>Talk about myself<br>Oral and second semester Exam | Oral<br>Work<br>Activity<br>Oral<br>work | Sing any<br>one poem | | 2 | 1 |
| **April** | Annual Exam | | | | | |

| इयत्ता पहिली वार्षिक नियोजन २०२०- २१ | | | विषय : कला |
|---|---|---|---|
| **महिने** | **चित्र-शिल्प** | **संगीत गायन वादन नृत्य** | **नाट्य** |
| **जून** | विषयाची ओळख | शाळापूर्व तयारी | स्वतःची ओळख |
| **जुलै** | रेखांकन- ठिपके रेषा आकार ओळख.<br>कागद शिल्प -कागदाची ओळख व फाडणे | गायन- बडबडगीत , राष्ट्रगीत ऐकणे<br>वादन- 1 ते 4 टाळ्या वाजवणे | पायाभूत हलचाली शरीर अवयवांच्या मुक्त हालचाली |
| **ऑगस्ट** | रेखांकन- ठिपके जोडून रेषा , आकार तयार करा<br>कागदशिल्प - उलट- सुलट घडी. | गायन-राष्ट्रगीत म्हणणे<br>नृत्य - डोके व मान हालचाली | अनुभव कथन स्वतःचे नाव सांगणे .<br>वाचिक अभिनय - दोन मित्र संवाद |
| **सप्टेंबर** | रेखांकन- रेषांची गम्मत<br>कागदशिल्प - कागद फाडणे व चिटकावणे ( मासा) | गायन - अक्षर गीत<br>नृत्य - प्राणी व पक्ष्यांच्या हालचाली | प्राणी , पक्षी अवजांची नक्कल व हालचाली<br>वाचिक अभिनय - फुगेवाला व मी संवाद |
| **ऑक्टोबर** | स्मरण चित्र- गोल, त्रिकोणी, चौकोनी वस्तू<br>नक्षीकाम - अंकांचे चित्र | समूहगीत- वंदे मातरम<br>येत असलेले नृत्य करा | अभिनय - सादरीकरण |
| **नोव्हेंबर** | सराव उपक्रम | सराव उपक्रम | सराव उपक्रम |
| **डिसेंबर** | सुलेखन- अक्षरांचे अवयव<br>कागदशिल्प - कागदाचे गोळे करणे व चिटकवणे ( स्ट्रॉबेरी) | गायन - पारंपरिक गीत<br>नृत्य - पंजे व मुठी यांच्या हालचाली<br>वादन - विविध गोष्टींचा आवाज | वाहने आवाजांची नक्कल<br>वाचिक अभिनय - दुकानदार व गिर्हाईक संवाद |

| | | | |
|---|---|---|---|
| **जानेवारी** | माझ्या मित्रांची चित्रे- मोर , अननस, फुल, ससा.<br>कागदशिल्प - कागदाची घडी घालने व पिशवी तयार करणे | गायन - बडबड गीत<br>नृत्य हातांच्या हालचाली<br>वादन - वाद्यांची ओळख - घंटा टाळ लेझीम घुंगरू ढोल | वाचिक अभिनय - भाजीवाला व विक्रेता |
| **फेब्रुवारी** | माझे चित्र - सफरचंद, चेंडू, पतंग, मांजर.<br>चित्र - घर (टाकाऊ वस्तूंपासून ) | वादन - वाद्यांची ओळख - डमरू, बासरी, सनई, पेटी, ताशा, तबला, खंजिरी, पखवाज.<br>नृत्य - जोडीदारासह हालचाली.<br>गायन - बडबड गीत. | वाचिक अभिनय - वाहक प्रवासी संवाद |
| **मार्च / एप्रिल** | सराव, मूल्यमापन , प्रत्येक्षिक परीक्षा | | |

| **इयत्ता पहिली वार्षिक नियोजन २०२०- २१** | | | | **विषय : कार्यानुभव** |
|---|---|---|---|---|
| **महिने** | **गरजाधिष्टीत उपक्रम** | **अभिरुची पूर्वक उपक्रम** | **कौशल्याधिष्ठित उपक्रम** | **ऐच्छिक उपक्रम संगणक** |
| **जून** | वर्ग पूर्वतयारी | | | |
| **जुलै** | गाणे- पाऊस | कागद फाडणे | बोटांचे ठसे काम परसातील बागकाम | |
| **ऑगस्ट** | पाण्याची मैत्री<br>दिन विशेष | रंगीत कागदाचे गोळे करणे | बियांचे ठसेकाम<br>चित्रावरून फळे ओळखणे | 1) यंत्रे व स्वाध्याय<br>2) संगणकाचे भाग व स्वाध्याय |
| **सप्टेंबर** | पाणी पिण्याची पद्धत | रंगीत कागदाची उलट - सुलट घडी | भेंडीचे ठसे काम<br>मत्स्य व्यवसाय | 3) संगणकाचे उपयोग व स्वाध्याय<br>4) कीबोर्ड व स्वाध्याय |
| **ऑक्टोबर** | तोंडी परीक्षा व व्यवसाय तपासणे | 0 | 0 | ५. माऊस (स्पष्ट करणे) ( माऊस चा स्वाध्याय ) ६. प्रकल्प -१. (स्पष्ट करणे) प्रथम सत्रातील उजळणी. |
| **नोव्हेंबर** | दिनविशेष - बालदिन | सराव उपक्रम | सराव उपक्रम<br>सराव उपक्रम | 7) इनपूट आणि आऊटपूट व स्वाध्याय<br>8) इनपूट आणि आऊटपूटसाधने व स्वाध्याय |
| **डिसेंबर** | जलसाक्षरता पाण्याचे स्त्रोत | फुलपाखराच्या आकारावर कागदाचे गोळे चिटकवणे | पानांचे ठसे काम<br>रोप लावणे ,<br>कापडाचे विविध भाग . | 9)इतर साधने व स्वाध्याय<br>10)तुमच्या संगणकाची काळजी व स्वाध्याय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **जानेवारी** | पाण्याचा वापर | कागदी पिशवी तयार करणे | कागदी पंखा<br>मातीचे गाणे बडबड गीत | 11) तुमचा संगणक सुरु आणि बंद करणे व स्वाध्याय |
| **फेब्रुवारी** | पाण्याची स्वच्छता | सफरचंद चे चित्र काढून त्यावर बिया चिटकवणे | कागदी मासा<br>शेतीपूरक व्यवसाय | 12) स्वाध्याय प्रकल्प 2 द्वितीय सत्रातील उजळणी |
| **मार्च** | सराव, मूल्यमापन , प्रत्येक्षिक परीक्षा | | | तोंडी परीक्षा व व्यवसाय तपासणे |
| **एप्रिल** | द्वितीय सत्र मूल्यमापन | | | |

**इयत्ता पहिली वार्षिक नियोजन २०२०- २१** **विषय : शा . शिक्षण**

| **महीने** | **आरोग्य विषयक** | **विविध हालचाली** | **खेळ व शर्यती** | **कौशल्यात्मक उपक्रम** | **व्यायाम** |
|---|---|---|---|---|---|
| **जून** | वर्ग पूर्वतयारी | | | | |
| **जुलै** | माझी दिनचर्या - सूर्योदयापूर्वी , उठणे, प्रातर्विधी, दात घासणे | मान गोलाकार फिरवणे<br>कमरेचा भाग गोलाकार फिरवणे | चमचा लिंबू , तीन पायांची , शर्यत लंगडी. | पुढील कोलांटी | पाठीवर झोपून करावयाची शरीरस्थिती |
| **ऑगस्ट** | माझी दिनचर्या - , आंघोळ करणे , केस विंचरणे , जेवण करणे . | मनगटातून हात गोल फिरवणे<br>पायाचा पंजा गोल आणि आजूबाजूला फिरवणे | आंधळी कोशिंबीर , सूरपारंब्या , विषामृत . | मागील कोलांटी | नांगरासारखी स्थिती |
| **सप्टेंबर** | माझी दिनचर्या - स्वच्छ कपडे घालणे , शाळेत जाणे , मैदानावर खेळणे | हात कमरेवर ठेवून पुढे वाकवणे व मागे वाकवणे | बैठे खेळ | चेंडू फेकणे व चेंडू ढकलणे | नागासारखी व मगरी सारखी स्थिती |
| **ऑक्टोबर / नोव्हेंबर** | सराव , मूल्यमापन , प्रात्यक्षिक परीक्षा | | | | |
| **डिसेंबर** | माझी दिनचर्या - अभ्यास करणे, घरची कामे करणे , झोपणे. | साहित्यासह हालचाली | स्थानिक व पारंपरिक खेळ | चेंडू झेलणे , चेंडू इतरांसोबत झेलणे | पर्वतासारखे , धनुष्यासारखे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जानेवारी | जोडी लावा - दैनिक आरोग्य कारक सवयी | पान नंबर 13 - सहकाऱ्या सोबत हालचाली. सावधान विश्राम | विविध खेळ व शर्यती | चेंडू मारणे | चौके सारखे मांडी ( पद्मासन) |
| फेब्रुवारी | आहार | तालबद्ध कवायत | स्नायूंचा दमदारपणा स्नायूंची ताकद | रिंग झेलणे, हाताने ढकलणे , हाताने ओढणे | झाडासारखे |
| मार्च / एप्रिल | सराव , मूल्यमापन , प्रात्यक्षिक परीक्षा | | | | |

**इयत्ता--दुसरी**

| इयत्ता दुसरी वार्षिक नियोजन २०२०-२०२१ | | | | विषय-मराठी | |
|---|---|---|---|---|---|
| महिने | घटक | साधन तंत्र | उपक्रम | ई लर्निंग | गृहपाठ |
| जून | वर्गपूर्वतयारी- गाणी, गोष्टी, मुळाक्षरं वर आधारित शब्द वाचन, लेखन - फरक ओळखूया, लोभी कुत्रा (चित्र बघा व गोष्ट पूर्ण करा), अनुलेखन- पाठ्यपुस्तकातील उतारा. | तोंडीकाम कृती निरीक्षण प्रात्यक्षिक वर्गकार्य | अक्षरे क्रमाने जोडून चित्र पूर्ण कर, माझी आवड - सांग व लिही | 1 | - |
| जुलै | 2. देवा तुझे किती (गाणे) आमचे घर शेवटच्या अक्षराची गंमत चित्र पूर्ण करूया 4. चतुर हिराबाई 5. फुलपाखरू (कविता). निबंध मी (स्वतःविषयी) | निरीक्षण तोंडीकाम उपक्रम कृती | रंगीबेरंगी फुलपाखरांची चित्रे जमवा | 1 | 1 |
| ऑगस्ट | 7. वडेश बहरला. कविता पूर्ण कर. खेळूया शब्दांशी. भाज्यांचे भांडण , आजिचे जेवण 8. चित्रवाचन 9. हळूच या हो हळूच या ! (कविता) 10. चिंटू रुसला.... चिंटू हसला निबंध पावसाळा | निरीक्षण तोंडीकाम उपक्रम कृती वर्गकार्य | शब्दांचा खेळ तयार करा खेळण्याचे चित्र जमवा चिटकवा | 1 | 1 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **सप्टेंबर** | 12. पाऊस फुले 13. एक तांबडा भोपळा (कविता) 14. झरीपाडा. नावांचा लपंडाव नाव. नावा ऐवजी येणारे शब्द परिसर समजून घेऊया शब्दाडोंगर. निबंध माझी आई | निरीक्षण तोंडीकाम उपक्रम कृती प्रकल्प वर्गकार्य | आपल्या परिसरातील झाडांची नावे लिहा. झाड, घर, बाहुली हे शब्द घेऊन शब्द डोंगर तयार करा | 1 | 1 |
| **ऑक्टोबर** | प्रथम सत्र उजळणी. प्रथम सत्र संकलित मूल्यमापन | | | | |
| **नोव्हेंबर** | जोडाक्षर युक्त शब्द वाचन लेखन शब्दांचा डोंगर ,कविता गायन भाग-3 चित्रवाचन निबंध माझा आवडता प्राण | तोंडीकाम प्रात्यक्षिक निरीक्षण. प्राण्यांची चित्रे जमवा व चिटकवा | | 1 | 1 |
| **डिसेंबर** | 16.चुलीवरची खीर (कविता) 17. दिनदर्शिका 18. हिवाळा (कविता) खेळूया शब्दांशी कविता पूर्ण करा क्रुती ओळखू या, लिहूया. एक अनेक ओळखू या वाचूया लिहूया | तोंडीकाम निरीक्षण वर्गकार्य प्रात्यक्षिक | दिनदर्शिका तयार कर | 1 | 1 |
| **जानेवारी** | जाहिरात वाचन. प्रश्न विचारुया 21 आपला भारत वाचूया लिहूया भाग-4 22. चित्रवाचन दिवस-रात्र 24. फुलांचे संमेलन निबंध चित्र वर्णन | जाहिरात वाचनाचे वर्तमानपत्रातील का कात्रणे गोळा करा | | 1 | 1 |
